## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ०३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०२/०१/२०१७

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक ३१/१२/२०१६ रोजी १०.०० वा. दर. यातील फिर्यादीची मुलगी हि शौचास जाते म्हणुन फिर्यादीला सांगुन घरून निघुन गेली तिचा शोध घेतला असता ती परत मिळुन न आल्याने कोणीतरी अज्ञात इसमाने मुलीला फुस लावुन पळवुन नेले असावे अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन हाता बुक्यानी मारपीट करून ठार मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/१२/२०१६ रोजी १०.३०ते ०१/०१/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी अधिक बंडु मोहीते वय ४० वर्ष रा. मल्हाड पोस्ट पातन जि. सातारा ह. मु. गोसे कॉलोनी हे त्याचे साईडवर काम करीत असतांना यातील आरोपींतानी गैरकायदयाची मंडळी तंयार करून फिर्यादीस जबरदस्तीने काम करू न देण्याचा व काम बंद पाडण्याचे सामाईक उद्देशाने एकत्र येवुन फिर्यादीस शिवीगाळ करून तसेच हाताबुक्याने मारहान करून जबरदस्तीने काम बंद पाडल्याने व पुन्हा काम सुरू केला तर ठार मारण्याची धमकी दिली असे फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,१४७,१४९,३४१,३२३,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) हयगयीने मोटार सायकल चालवुन इसमास जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०१/०१/२०१७ चे १२.०० वा. दर. यातील फिर्यादी शिशुपाल सुखदेव भुरे वय ३१ वर्ष रा. शिवनगरी खातरोड भंडारा हा आपल्या मेकॅनिकल दुकानातुन भंडारा कडे टि.व्ही.एस. स्टॅर सीटी. मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम १५६८ नी येत असता यातील आरोपीने आपले गाडी ट्रिपल सीट बसुन हे त्याचे मागेहुन बाजुने भंडारा कडुन येत असतांनी आपल्या ताब्यातील ॲव्हेंजर मोटार सायकल हयगयीने व लापरवाहीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल धडक देवुन जखमी केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७, भादवी. सहकलम १२८/१७७ मोवाका अन्वये दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) हयगयीने मोटार सायकल चालवुन पायी जाणाऱ्या महीलेला धडक देवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/१२/२०१६ चे २१.३० वा. दर. यातील आरोपीने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व लापरवाहीने चालवुन जखमी श्रीमती सिंधुबाई भुरे वय ६५ वर्ष रा. कारधा ही पायदळ जात असता तिला धडक मारून जखमी केले व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अशोक रघुनाथ भुरे वय ४२ वर्ष रा. कारधा यांचे तोंडी व डॉ रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७, भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला . पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) अवैध दारू अडयांवर धाडी . :–**

दिनांक ०१/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. भंडारा, व कारधा येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २० लिटर हातभट्टी दारु कि. १,६४०/–रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.